शैक्षणिक वर्ष २००९-१०
अस्तित्वात असलेल्या महाविद्यालयात
नवीन अभ्यासक्रम/विषयांना मान्यता (दुसरी यादी)

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**
शासन आदेश क्रमांक एनजीसी २००९/(१७१/०९)/मशि-४
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक : १४ जुलै, २००९

पहा:-१) शासन निर्णय क्रमांक-एनजीसी२००९ / (३३/०९) / मशि-३,
दि.१८.०२.२००९ (Task Force)
२) संचालक, उच्च शिक्षण यांचे पत्र क्र. एनजीसी / ०९-१० /नवि महा अतु / मान्यता /
मवि २-३, ११६९, दि. २८.०५.२००९

**शासन आदेश**

महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ मधील कलम ८२(४) नुसार राज्यातील विद्यापीठांनी शासनाकडे अस्तित्वात असलेल्या महाविद्यालयात नवीन अभ्यासक्रम/विषयांना मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करावयाचे असतात, त्यानुसार शैक्षणिक वर्ष २००९-१० साठी राज्यातील विद्यापीठांकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावांची शासन निर्णय क्रमांक-एनजीसी२००९/ (३३/०९) / मशि-३, दि.१८.०२.२००९ अन्वये स्थापित कृतिसमितीद्वारे छाननी करण्यात आली. कृती समितीचे अभिप्राय / शिफारशी व विद्यापीठाच्या शिफारशी विचारात घेऊन महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ मधील कलम ८२(५) व ८३(५) अन्वये शासनास प्राप्त अधिकारानुसार अस्तित्वात असलेल्या महाविद्यालयात पुढील विवरणात नमूद केल्यानूसार नवीन अभ्यासक्रम/विषयांना खालील अटी व शर्ती च्या अधिन राहून कायम विना अनुदान तत्वावर मंजूरी देण्यात येत आहे.

**विद्यापीठाचे नाव : पुणे विद्यापीठ, पुणे**
**पुणे जिल्हा - कला, वाणिज्य व विज्ञान विद्याशाखा**

| अ. क. | महाविद्यालयाचे नांव | अभ्यासकम / विषय |
|---|---|---|
| १. | वसंतदादा शुगर इन्स्टिटयूट, माजरी बु.ता.हवेली, जि.पुणे | एम.एस्सी. वाईन टेक्नॉलॉजी |
| २. | श्री.बालाजी सोसायटी, पुणे | बी. एस्सी. (इन्व्हायरमेंटल, इलेक्ट्रॉनिक्स, मायक्रोबायॉलॉजी) |
| ३. | सरहद कॉलेज ऑफ आर्टस ॲण्ड कॉमर्स, पुणे | एम.एस्सी. (कॉम्प्युटर सायन्स)<br>एम.कॉम.- ॲडव्हान्स्ड बी ॲण्ड एफ<br>एम.सी.ए. |
| ४. | सिंहगड कॉलेज ऑफ सायन्स, सर्व्हे नं.४४-१, वडगाव (बु,) ता.हवेली, जि.पुणे | एम.एस्सी.<br>१. पेट्रोलियम टेक्नॉलॉजी<br>२. मायक्राबायोलॉजी |
| ५. | लिलावती कॉलेज, माळवाडी, ता.हवेली, जि.पुणे | पी.जी.डिप्लोमा इन टॅक्सेशन<br>बी.बी.एम. |
| ६. | श्री. पद्मणी जैन महाविद्यालय, मु.पो. पाबल, ता.शिरुर, जिल्हा पुणे | बी.बी.ए.<br>बी.सी.ए. |
| ७. | दादा पाटील राजळे कला व विज्ञान महाविद्यालय, आदिनाथनगर, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर | बी.एस्सी. (इलेक्ट्रॉनिक्स) |
| ८. | एस.एस.आर.कॉलेज ऑफ आटस, कॉमर्स ॲण्ड सायन्स संजीभाई देलकर मार्ग, सायली,सिल्वासा , दादरा. | बी.बी.ए. |

शासन आदेश क्रमांक एनजीसी २००९/(१७१/०९)/मशि-४मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक : १४ जुलै, २००९

| अ. क. | महाविद्यालयाचे नांव | अभ्यासक्रम / विषय |
|---|---|---|
| **विद्यापीठाचे नाव : स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड जिल्हा नांदेड** | | |
| ९. | यशवंत कॉलेज ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी, परभणी | बी. एस्सी. (नेटवर्कींग टेक्नॉलॉजी) |
| **विद्यापीठाचे नाव : राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर व्यावसायिक** | | |
| १०. | डॉ. एम. के. उमाठे कला व श्री. रामचंदराव मोखारे वाणिज्य महाविद्यालय, भामटी, रिंग रोड, नागपूर, जि. नागपूर | पी.जी.डी.एफ.एम.<br>पी.जी.डी.एम.एम. |
| ११. | स्व.राजे तेजसिंगराव भोसले कॉलेज ऑफ मॅनेजमेंट, तुकूम, ता.जि.चंद्रपूर | एम.सी.एम.<br>पी.जी.डी.सी.सी.ए.<br>बी.बी.ए.बी.सी.ए. |
| १२. | श्रीमती रेवाबेन मनोहरभाई पटेल महिला कला महाविद्यालय, भंडारा,<br>जि. भंडारा | १. एम.ए. (हिंदी)<br>२. एम.ए. (अर्थशास्त्र)<br>३. एम.ए. (राज्यशास्त्र)<br>४. एम.ए. (संगीत) |
| १३. | मोहसिनभाई जव्हेरी महाविद्यालय, वडसा (देसाईगंज), जिल्हा गडचिरोली | बी.कॉम, सी.ए.<br>बी.बी.ए.<br>बी.सी.ए. (विज्ञान) |
| **विद्यापीठाचे नाव : संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती** | | |
| १४. | विनायक विद्यामंदिर वाणिज्य विज्ञान महाविद्यालय, फरशी स्टॉप, दस्तुरनगर रोड, अमरावती | बी.बी.ए. |
| १५. | महात्मा ज्योतीबा फुले कला व<br>विज्ञान महाविद्यालय, पातुर,<br>जि. अकोला. | १) इतिहास २) मराठी वाडमय<br>३) संगीत ४) जियॉग्राफी<br>५) गृह विज्ञान ६) परशियन |
| १६. | स्व. उत्तमराव देशमुख अध्यापक महाविद्यालय, शेगांव, जिल्हा बुलढाणा | बी.बी.ए., बी.सी.ए. |
| **विद्यापीठाचे नाव : उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव** | | |
| १७. | आर.सी.पटेल एज्युकेशन ट्रस्ट शिरपूर संचलित आर.सी.पटेल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, जिल्हा धुळे | बी.बी.एम. (आय.बी.) |

शासन आदेश क्रमांक एनजीसी २००९/(१७१/०९)/मशि-४मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक : १४ जुलै, २००९

| | | |
|---|---|---|
| **विद्यापीठाचे नाव : डॉ.बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठ, औरंगाबाद** | | |
| १८. | स्व.माणिकराव दादा कदम पाटील माहिती व तंत्रज्ञान महाविद्यालय, जिल्हा उस्मानाबाद | बी.सी.ए. |
| १९. | नांलदा बी. सी. ए. कॉलेज एन ११, सिडको, औरंगाबाद | बी. एस्सी संगणकशास्त्र |
| २०. | श्री. समर्थ चॅरिटेबल ट्रस्ट, उस्मानाबाद संचलित संत ज्ञानेश्वर व्यवस्थापन शास्त्र महाविद्यालय, उस्मानाबाद. | बी.बी.एम., एम.सी.एम.<br>बी.एस.सी. (सी.एस.) |
| **विद्यापीठाचे नाव : शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर** | | |
| २१. | आर्टस् अ‍ॅन्ड सायन्स महाविद्यालय सावळज , ता. तासगाव जि. सांगली | बी. ए. भाग ३ - इंग्रजी स्पेशल |
| २२. | यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालय, वारणानगर, जि. कोल्हापूर | बी. एस्सी भाग १ - कॉम्प्यूटर सायन्स (ऐच्छीक) |
| २३. | कासेगांव एज्युकेशन सोसा.श्रीमती कुसुमताई राजारामबापू पाटील कन्या महाविवद्यालय (कला, वाणिज्य व विज्ञान), इस्लामपूर, जिल्हा सांगली | एम.एस.सी. (भाग-१) कॉम्प्यूटर सायन्स |

अटी व शर्ती:-

(१) अस्तित्वात असलेल्या महाविद्यालयात नवीन अभ्यासक्रम/ विषयांना मंजूर करण्यात आलेल्या आहेत, त्या महाविद्यालयांने त्यांच्या विभागीय सहसंचालककांकडे ते भविष्यात कोणत्याही परिस्थितीत अनुदानाची मागणी करणार नाहीत असे हमीपत्र रु. १००/- च्या नॉन ज्युडीशियल स्टँप पेपरवर सादर करावे.

(२) संबंधित विभागीय सहसंचालकांचे हमीपत्र सादर केल्याविषयीचे प्रमाणपत्र प्राप्त झाल्याशिवाय विद्यापीठांने संलग्नतेची प्रक्रिया सुरु करु नये.

(३) विद्यापीठाने विहित केलेल्या निकषानुसार व विद्यापीठ अनुदान आयोगाने विहित केलेल्या शैक्षणिक पात्रतेनुसार महाविद्यालयांनी, अध्यापक वर्ग/ कर्मचारी वर्ग नेमणे आवश्यक असून इतर सर्व आवश्यक पायाभूत सोयी उपलब्ध कराव्यात व त्याची खात्री विभागीय सहसंचालकानी ३० ऑगस्ट पर्यंत करावी व तद्नंतरच उपरोक्त अट क्रमांक २ मधील प्रमाणपत्र विद्यापीठास द्यावे.

(४) महाविद्यालयांने कोणत्याही परिस्थितीत मंजूर प्रवेश क्षमतेपेक्षा जास्त प्रवेश देऊ नयेत.

(५) नवीन अभ्यासक्रम/विषय मंजूर करण्यात आलेल्या महाविद्यालयांनी सन २००९-१० व २०१०-११ मध्ये NAAC ॲक्रीडीएशन प्राप्त करुन घ्यावे व ते या कालावधीत न मिळविल्यास सदर तुकडी मान्यता आपोआप रद्द होईल.

(६) महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ मधील कलम ८२ (५) व ८३(५) नुसार ही मान्यता शैक्षणिक वर्ष २००९-१० पासून देण्यात येत आहे. ही मान्यता फक्त शैक्षणिक वर्ष २००९-१० पूरती मर्यादीत राहील. यावर्षी नवीन अभ्यासक्रम/विषय सरु न केल्यास ही मान्यता आपोआप रद्द होईल.

२. विद्यापीठाचे संलग्निकरण देण्याबाबत आवश्यक असलेली पुढील कार्यवाही विद्यापीठांनी करण्यापूर्वी शासनाच्या मान्यतेबाबतचे आदेश शासनाच्या संकेतस्थळावर अवलोकन केल्याशिवाय व विभागीय सहसंचालकाचे प्रमाणपत्र मिळाल्याशिवाय संलग्नता देण्याची प्रक्रिया सुरु करु नये. विद्यापीठांनी संलग्नतेबाबतचा पूर्तता अहवाल संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे व संबंधित विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य यांना पाठवावा.

३. संबंधीत विद्यापीठांनी व विभागीय सहसंचालकांनी नवीन अभ्यासक्रम/विषयांबाबतचा नियतकालिक आढावा घेवून जर अभ्यासक्रम/विषयांमध्ये मंजूर विद्यार्थी संख्येच्या ५० टक्के किंवा त्यापेक्षा कमी विद्यार्थी दिसून आल्यास सदर अभ्यासक्रम/विषयांची रद्द समजून तसे शासन व विद्यापीठाच्या माहितीने विभागीय सहसंचालकांनी आदेश काढावेत.

४. हे आदेश, राज्य शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक २००९०७१६१६१२४७००१ आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( सदाशिव शिवदास )
सहसचिव , महाराष्ट्र शासन

प्रत,

१) कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य,
२) संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
३) सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य,
४) संबंधित संस्था,
५) निवड नस्ती (मशि-४)